लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# ‘पर्यावरणाचे रक्षण ही सर्वांची नैतिक, कायदेशीर जबाबदारी’

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** हवामान बदलाच्या धोक्याच्या टप्प्यावर आपण पोहोचलो आहोत. आज पर्यावरण वाचवण्याची गरज आहे. पर्यावरण आणि हवामान एकमेकांशी जोडलेले असल्याने पर्यावरणाचे रक्षण करणे ही सर्वांची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे, असे प्रतिपादन प्रा. बी.एन. गोस्वामी यांनी केले.

सीएसआयआर-नीरीच्या स्थापनादिनानिमित्त सोमवारी नीरीच्या सभागृहात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर गुवाहाटीच्या कॉटन विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाचे प्रा. बी.एन. गोस्वामी, केंद्र सरकारच्या संरक्षण मंत्रालयातील जीवन विज्ञान, संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे महासंचालक व शास्त्रज्ञ डॉ. उपेंद्र कुमार सिंग, सीएसआयआर-नीरीचे संचालक डॉ. अतुल वैद्य होते. ‘द क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट’ या विषयावर प्रा. गोस्वामी यांनी हवामान बदलाबाबत चिंता व्यक्त केली. विकास मॉडेलमध्ये बदल करून सामाजिक जाणीव विस्तारण्याचा सल्ला प्रा. गोस्वामी यांनी दिला. गेल्या २०० वर्षांत मानवी क्रियाकल्पांमुळे नैसर्गिक समतोल लक्षणीयरित्या बिघडले आहे. वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईडची सध्याची पातळी ४२३ पीपीएम आणि मिथेन १९२१ पीपीबी आहे, अशी माहिती प्रा.गोस्वामी यांनी दिली. डॉ. उपेंद्र कुमार सिंग यांनी त्यांना २०४७ मध्ये अपेक्षित प्रगतीशी संबंधित आव्हाने आणि तंत्रज्ञानाची माहिती दिली. २०३० पर्यंत भारतामध्ये जगातील तिसऱ्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेच्या स्थानावर जाण्याची क्षमता आहे, जो ग्रामीण आणि शहरी उत्पन्नाच्या समानतेसह एक मैलाचा दगड ठरेल, असे डॉ. सिंग म्हणाले.

> **मानवी क्रियाकल्पांमुळे नैसर्गिक समतोल लक्षणीयरित्या बिघडले आहे. वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईडची सध्याची पातळी ४२३ पीपीएम आणि मिथेन १९२१ पीपीबी आहे, अशी माहिती प्रा.गोस्वामी यांनी दिली.**



कार्यक्रमात बोलताना प्रा. बी.एन. गोस्वामी.

पर्यावरणासमोरील आव्हानांना तोंड देण्यासाठी सीएसआयआर-नीरीने स्वतःला स्थान दिल्याची माहिती संस्थेचे संचालक डॉ. अतुल वैद्य यांनी दिली. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान मॉडेल स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. सीएसआयआर-नीरीतील अधिकाऱ्यांना त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल स्थापना दिन पुरस्कार देण्यात आला. प्रास्ताविक प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. कविता गांधी यांनी केले. वरिष्ठ मुख्य शास्त्रज्ञ प्रकाश कुंभारे यांनी आभार मानले. शहरातील विविध शाळा आणि महाविद्यालयातील सुमारे १२०० विद्यार्थ्यांनी यावेळी सीएसआयआर-नीरीला भेट दिली. स्थापना दिनानिमित्त यावेळी रक्तदान शिबीर देखील आयोजित करण्यात आले होते.

09/04/2024 | Nagpur | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com